संत जनाबाईच्या अभंगातील स्त्री मनाचे चित्रण

डॉ. बी.व्ही. डिगोळे
मराठी विभाग, प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

संत नामदेवगाथेतच जनीच्या अभंगाचा समावेश केलेला आहे. हे नामदेवगाथेच्या सरकारी प्रतीवरून दिसून येते. संत नामदेव आणि त्यांच्या परिवारातील सर्वजण अभंग लिहीत असत. नामदेवांची मुले (नारा,विठ्ठल, महादा, गोंदा) सुना नामदेवांची आई आऊबाई, मुलगी - लाडाई हे सर्वजण अभंग लिहीत. सर्वांच्याच अभंगाचा समावेश नामदेवगाथेत करण्यात आला आहे. सुरूवातीस या काव्याकडे एक पारमार्थिक साहित्य म्हणूनच पाहिले गेले; परंतु संतांचे साहित्य हे केवळ अध्यात्मिक साहित्य नसून कविता या दृष्टीने साहित्य मूल्यवान आहे. किंबहुना यादव काळातील एक संपन्न साहित्य म्हणून या साहित्याकडे रसिकांचे लक्ष वेधले जाते.

मराठी संत कवी मंडळात जनाबाई यांचे स्थान उल्लेखनिय आहे. जनीचे स्वतंत्र असे सुसंगत चरित्र उपलब्ध नाही. तथापि, महिपतीबुवा ताहराबादकर यांनी भक्तिविजयात जी माहिती दिली आहे तीच जनीसंबंधी अधिकृत माहिती समजली जाते. गंगाखेड (जिल्हा परभणी) हे जनीचे जन्मस्थान समजले जाते. दमा व करूंड या शुद्र दांपत्याच्या पोटी जन्म झाला. लहानपणीच आई वारल्यामुळे दमाने जनीला नामदेवांचे वडील दामाशेट्टी यांच्याकडे सांभाळण्यासाठी ठेवले. कालांतराने जनीच्या वडीलांचेही निधन झाले. आणि जनीचा नामदेवांच्या कुटूंबाशी कायमचा संबंध जोडला गेला. नामदेवांच्या घरी दळण, कांडण, धुणी, भांडी, सडा, सारवण इत्यादी. काबाडकष्ट जनीला करावे लागत. परंतु संत नामदेव, संत ज्ञानेश्वर इत्यादी थोर संतांचा सहवास जनीला लाभला आणि तिचे जीवन बदलले अनन्यभक्त म्हणून सर्व संतांच्या कसोटीला जनी उतरली. आणि मराठी संतमंडळात जनीला संत जनाबाई असे म्हटले जाऊ लागले. या पलीकडे जनीच्या चरित्राबद्दल ऐतिहासिक माहिती मिळत नाही. ती केंव्हा जन्मली तिचे आर्युमान काय होते या संबंधी इतिहासाला कांहीही माहिती नाही. विठ्ठलाचे पदक चोरल्याचा आळ आला या प्रसंगाचे मात्र जनीने स्वतःच वर्णन केले आहे संत नामदेवानेही या प्रसंगावर एक आख्यान लिहिले आहे. हा प्रसंग वगळता जनीबद्दल सुसंगत अशी कोणतीही माहिती मिळत नाही.

यादव काळ हा मराठी साहित्यचा सुवर्णकाळ समजला जातो. महानुभाव कवी, ग्रंथकार, साहित्यिक आणि भागवत धर्माचे प्रवर्तक नामदेव, ज्ञानदेव आणि त्यांचे समकालीन संत यांनी प्राचीन मराठी साहित्य अनेक अंगांनी समृध्द केले; परंतु या कालखंडाचे एक उल्लेखनीय वैशिष्टय म्हणजे यादव काळात स्त्रियांनी देखील विपुल काव्यनिर्मिती केली आहे. चक्रधरांची शिष्या महदाईसा ही आद्य कवयित्री यादव काळातच होऊन गेली. संत चोखामेळा यांच्या पत्नी सोयराबाई, बहिण निर्मळा, संत नामदेव यांची आई आऊबाई, मुलगी लाडाई, आणि नामदेवांची दासी जनी या सर्वांचे कवीत्व उपलब्ध आहे. ज्ञानदेवांची बहिण मुक्ताई हीचा तर अध्यात्मिक अधिकार इतका श्रेष्ठ होता की, वयोवृध्द चांगदेव हे मुक्ताईस शरण गेले. मुक्ताईचे 'ताटीचे अभंग' प्रसिध्द आहेत. तुलनात्मकदृष्टया विचार केल्यास मध्ययुगात विशेषतः यादव काळात जेवढी काव्यनिर्मिती केली. तेवढी पुढील काळात आढळत नाही. तुकारामाची शिष्या बहेणाबाई, समर्थांच्या शिष्या वेणाबाई, प्रेमाबाई हीच काय ती

स्त्रियांची मोजकी उदाहरणे आढळतात. या दृष्टीने यादवकाळ मात्र स्त्रियांच्या कवितेनेही समृध्द बनला आहे. या परंपरेतील जनीचे काव्य एक उल्लेखनीय काव्य आहे.

जनीची कविता प्राय: अभंगाच्या रूपात आहे. जनीने अभंगाच्या माध्यमातूनच आपले पारमार्थिक अनुभव कथन केले. भक्ती ही जनीच्या कवितेचा मुख्य गाभा आहे. त्या दृष्टीने अभंगासारख्या उस्फूर्त माध्यमातून जनीला आपले अनुभव सहजपणे कथन करता आले. संत नामदेव महाराज हे जनीचे प्रेरणास्थान होते. संत नामदेव महाराज हे श्रेष्ठ भक्त तर होतेच; पण आपल्या कीर्तन भक्तीने नामदेवांनी भागवत धर्माचा सर्वदूर प्रसार केला. त्यांच्यापासून अनेकांना भक्तीची प्रेरणा मिळाली आणि भक्त म्हणून सर्वश्रेष्ठ मान्यता मिळाली. जनी, संतचोखामेळा, परसा भागवत (माझे भागवत ऐका यांच्यावरून परसा भागवत हे नाव पडले.) हे नामदेवांच्याच प्रेरणेने भागवत धर्माचे अनुयायी बनले. नामदेवांच्या प्रसार कार्यामुळे सारा महाराष्ट्र ढवळून निघाला. महार, कुंभार, माळी, न्हावी इत्यादी अठरा पगड जातीतील संत उदयास आले. त्यांनी काव्यनिर्मीती केली. आणि कधी नव्हे एवढे मराठी साहित्य आपल्या अनुभवाने आणि काव्याने संपन्न केले. याचे कारण संत नामदेवांची प्रेरणा होय. जनीच्या कवितेच्या बुडासी संत नामदेव यांचे व्यक्तिमत्व प्रेरणादायी ठरले.

जनीच्या अभंगात प्रामुख्याने विठ्ठलभक्ती हा एकच आशय व्यक्त झाला आहे परंतु त्या आशयाची अनेक स्त्री सुलभ वैशिष्टये जनीच्या अभंगात आढळतात. स्त्री मनाची अनेक रूपे जनीच्या काव्यात आढळतात. विठ्ठल एकच; परंतु प्रत्येक संताच्या कवितेत त्याचे आगळे वेगळे रूप पहावयास मिळते. त्या दृष्टीने जनीच्या अभंगात आढळणारी विठ्ठलाची रूपे पाहणे उचीत ठरेल.

नामदेव, ज्ञानदेव इत्यादी संतानी पंढरीच्या विठ्ठलावर उत्कट प्रेम केले. विठ्ठल ही त्यांच्या दृष्टीने पाषाणाची मूर्ती नसून ती भावाची मूर्ती होती. प्रत्येकाच्या अंत:करणातील भावानुसार विठ्ठलाची अनेक रूपे संताच्या कवितेत आढळतात. जनीचा विठ्ठल तिच्याबरोबर दळू लागतो, कांडू लागतो, असे चित्र जनीच्या कवितेत आढळते. देव आपल्या कष्टात आणि श्रमात निरंतर सहभागी राहतो. त्याची आठवण काढताच तो आपणास साह्यासाठी धावून येतो. हा अनुभव जनीने आपल्या काव्यात वर्णन केला आहे. जनीच्या सर्व सुखदु:खात विठ्ठल हाच तिचा सखा असतो. तिच्या सर्व अवस्थात तो सावलीप्रमाणे तिची साथ करतो. ती नाहत असेल तर विसानासाठी थंड पाणी आणतो. पाण्यासाठी तो येरजारा घालतो. तर कधी कधी भल्या पहाटेपर्यंत जनीबरोबर दळू लागतो. जनी रानात गोवऱ्या वेचण्यासाठी जाते, तर तेथेही तो तिला मदत करतो. पुढे-पुढे तर जनीसाठी विठ्ठलच वेडा होतो. तो कधीही कोणत्याही वेळी जनीच्या झोपडीत येतो. त्याचे हे येणे आणि जनीच्या जात्यात वरणं घालीत आवडीने गाणी गाऊन सर्व संताना चकीत करून टाकत असत. देव जनीबरोबर दळू लागतो. हे दृश्य पाहून ज्ञानेश्वर, नामदेव यांना देखील हसू आले. आणि नवल वाटले कारण सकाळ होताच राऊळात सर्व भक्तगण देवाच्या काकडआरतीसाठी गोळा झाले; पण देव मात्र नेमका जनीच्या झोपडीत तिच्या बरोबर दळू लागतो. जो देव तिच्या बरोबर दळू लागतो, जो देव वेद, शास्त्र यांना देखील पुरतेपणाने कळाला नाही तो देव जनीचा अंकीत झाला हे पाहून सर्वांनाच नवल वाटले. अशा प्रकारचे विठ्ठलाचे एक मानवी रूप जनीच्या अभंगात आढळते. जनीच्या दृष्टीने तीचा विठ्ठल तिचे सर्वस्व असतो. आई-बाप, बंधू-सखी, मैत्रीण, गणगोत सर्व विठ्ठलच असतो जनीला तसे जगात कोणीही नव्हते; परंतु आपले सर्वस्व विठ्ठलच आहे. हा जनीच्या अंत:करणातील उत्कट भावाचा परिणाम असा झाला की, जनी आणि विठ्ठल यांच्यातील नाते हे केवळ लौकिक पातळीवरचे राहिले नाही विठ्ठलातच जनीने आपले सुख दु:ख पाहिले आणि तिच्या अध्यात्मिक जीवनाचे परिवर्तन होत गेले. पाहता पाहता विठ्ठलाने जनीच्या देह मनाचा ताबा घेतला. असा एकही क्षण आणि अवस्था उरली नाही. ही ज्यात विठ्ठलाची व्याप्ती नाही विठ्ठलाने आपल्या संकटात, दु:खात आणि

श्रमात धाऊन यावे असा धावा करणारी प्रसंगी त्याच्यावर रागावणारी आणि त्याला शिव्या घालणारी जनी आता मात्र देवाशी अभिन्नत्व पावली आहे.

''देवखाते,
देव पीते,
देवावरी मी निजते,
देव घेते,
देवा सवये व्यवाहारीते,
देव येथे, देव तेथे
देवावीना नाही रिते''

अशा शब्दात विठ्ठलाची अनुभूती जनी वर्णन करते. आता जनीचा विठ्ठल केवळ विटेवरच नसतो, तर तिच्या अनुभूतीतून आंतरबाह्य विठ्ठल व्यापून उरलेला असतो. अशा तऱ्हेने जनीच्या अभंगातील विठ्ठल ही केवळ भोळी, भाबडी व भोंगळ कल्पना जो नाही, तर तो एक दिव्यसाक्षात्कार आहे. सर्व भूतमात्रात चराचरात विठ्ठलास पाहते. ही जनीची अनुभूती आहे. भक्तीचा व मानवतेचा फार मोठा विजय आहे देव ही संकल्पना येथे वेगळे रूप धारण करते. एकाक्षणी देवास आंधळयाची काठी, चिमुकलेल्या पाडसांची हरिणी, किंवा चिमुकल्या पक्षांसाठी चारा आणणारी पक्षीण या रूपात जनीने संबोधले. त्याच विठ्ठलास विठाई, विठाबाई, पंढरीची आई या प्रेमळ संबोधनाने बोलावले, किंवा त्याच विठ्ठलास विठु किंवा रागावल्यानंतर 'विठया विठया मुळ मायेच्या कारटया' असेही म्हटले. तो विठ्ठल आता जनीला या विश्वात सर्वत्रच दिसू लागतो. आपल्या आत आणि बाहेर विठ्ठलानेच व्यापले आहे. ही जनीची अवस्था तिच्या अभंगात पाहवयास मिळते.

थोडक्यात जनीच्या अभंगात विठ्ठलाचे सगुणरूप आढळते, पण तेवढीच जनीच्या अनुभवास मर्यादा नाही. विठ्ठलाची व्यापक अनुभूती ही जनीच्या अमर्याद अनुभवाची प्रतिति तिच्या अभंगात आढळते.

जनी ही एक स्त्री होती. अर्थातच स्त्री मनाचे अनेक पैलू जनीच्या अभंगात आढळतात. स्त्रिचे मन अतिशय हळवे असते. विशेषतः घरदार, संसार, मुलेबाळे, आई-वडील, गणगोत, कामधाम यात स्त्रिचे मन सहज विरघळून जाते. तसे पाहिल्यास जनीला कोणताच संसार नव्हता. त्यामुळे पती, मुले, बाळे यांचा प्रश्न नव्हता पण आपला सर्व संसार जनीने विठ्ठलात पाहिला. तिला दिसणारा विठ्ठल म्हणजे यशोदीची बाळा असतो. या ठिकाणी बाळ याचे 'बाळा' हे रूप स्त्रिलाच सुचू शकते. भाविक भक्तासाठी कष्टणाऱ्या विठ्ठलास जनीने मैत्रीणीच्या व सखीच्या रूपात पाहिले. द्रौपदीकरता धाऊन बंधू श्रीकृष्ण जनीला अतिशय जवळचा वाटतो. वास्तविक श्रीकृष्ण द्रौपदीचा भाऊ नव्हता; पण द्रौपदी मात्र त्यास बंधू समजत असे. हे नाते जनीला अतिशय जवळचे वाटते. जनी विठ्ठलास ज्या नावाने संबोधते त्यास देखील स्त्री सुलभ एखाद्या मायेप्रमाणे सांभाळतो.

घार आकाशात हिंडते; पण तिचे सर्व लक्ष पिलापाशी असते. पक्षी आपल्या बाळासाठी चारा आणतात. त्यासाठी दूर आकाशात उडतात; पण त्यांच्या चित्तात त्यांची बाळे असतात, आई दिवसभर कोणत्या ना कोणत्या कामात गुंतते; पण तिचे सर्व चित्त आपल्या छोटया बाळापाशी असते. वानर आपल्या पिलांना पोटाशी उडया मारते; पण पिलाला मात्र ते खाली पडू देत नाही. त्याप्रमाणे विठ्ठल आमचा सांभाळ करतो. असे जनीला वाटते विठ्ठलाकडे अशा प्रकारच्या वात्सल्य भावातून जनी सारखीच स्त्री पाहू शकते. ज्ञानदेव, निवृत्तीनाथ हे अधिकाराने जनी पेक्षा देखील थोर होते. पण वयाने मात्र अतिशय लहान होते. त्या पोरक्या बाळांबद्दल जनीला वाटणारे प्रेम एखाद्या आईसारखी होते. त्या बाळांना पाहून तिचा जीव तिळ तिळ तुटत

असावा त्यांच्यावर पोटभर माया करणारी आई झालो असतो; तर किती बरे झाले असते. असे जनीला वाटत असावे; पण या जन्मी ते शक्य नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरांना ती विनंती करते -

''मरोनिया जावे बा
माझ्या पोटी यावे''

आपण मेल्यानंतर पुढील जन्मी ज्ञानदेवासारख्या बाळाने आपल्या पोटी यावे आणि आपण त्यांच्यावरून जीव ओवाळून टाकावा असे जनीला वाटते. हे केवळ एखाद्या स्त्रिलाच वाटू शकते. त्यात कारूण्य, आर्तता मिसळलेली असते.

अशा तऱ्हेने जनीचे स्त्रीमन तिच्या अभंगात दिसते. आई, बहिण, मैत्रीण अशा भूमिका तिच्या अभंगात आढळतात. संतांच्या विषयी तर जनीचे मन अतिशय हळवे असते. संतांना जन्म देणाऱ्या मामा तिला धन्य वाटतात. संत देखील तिला आपल्या मैत्रीणीप्रमाणे वाटतात लग्नातील वऱ्हाडी लोकांना ज्याप्रमाणे लग्न सोहळयात मांडे, पुरण, पोळया सहजच खावयास मिळतात. त्याप्रमाणे संतांच्या संगतीत जनीला सहजच विठ्ठलाची प्राप्ती झाली. अशा तऱ्हेचा भाव जनीसारखीच स्त्री वर्णन करू शकते. विठ्ठलास सकाळच्या प्रहरी भूपाळीतून आळवताना जनीने रूक्मीणी मातेस त्या घननिळास (विठ्ठलाचे नाव) उठविण्याची विनंती केली आहे. त्यातही स्त्री सुलभ नाजूक भावना व्यक्त झाली आहे. कारण रूक्मीणीसोबत शैय्यासुख भोगणाऱ्या विठ्ठलास रुक्मिणीशिवाय कुणीही जागे करू शकत नाही हा हळुवारभाव व्यक्त झाला आहे. गोरक्षनाथ यांच्यासाठी जनीने जो पाळणा गायला आहे त्यातही गोरक्षासाठी शब्दसुमनांचे सेज (अंथरूण) केली आहे. त्या बाळास त्या गोपाळास जनी उन्मनी स्थितीत गाणे गात असते आणि झोपवते यातही जनीची स्त्री सुलभ वृत्ती दिसून येते.

थोडक्यात जनीने स्त्रीसुलभ मनाला वाटणारे सर्वभाव विठ्ठलात पाहिले. संतात पाहिले कारण तिचे जीवन एक समपर्णच होत जाते. घराघरातच जनीची कविता जन्माला आली स्त्री जन्मात जे वाईटात वाईट दु:ख असते ते जनीला भोगावे लागले. पोरकेपणा दारिद्रय आणि त्यात अविरत रात्रंदिवस कष्टाची भर हे सर्व कढ जनीच्या अभंगात करूण शब्दात व्यक्त झाले आहे. पण ते सर्व विठ्ठलास उद्देशून हे मात्र केवळ जनीच्याच अभंगात दिसते. तसे जनीचे आंतरीक नाते चोखामेळा यांच्या कवितेसी जुळते. कारण चोखामेळा यांनी आपला अपमान, आपली हीनता, दारिद्रय, अवहेलना सर्व कांही विठ्ठलास उद्देशूनच कथन केले आहे. दगडालाही पाझर फुटावा असे चोखामेळयाचे उद्‌गार आहेत. म्हणूनच का कुणास ठाऊक चोखामेळा यांचा जनीने अनेक ठिकाणी तोंड भरून गौरव केला आहे. कारण देवाने द्रौपदी, चोखामेळा, चोखामेळा यांच्यासाठी श्रम घेतले आहे. तोच देव जनीसाठी देखील कष्टत असतो. हे देवाचे आणि जनीचे नाते तिच्या स्त्रीसुलभ शब्दातून व्यक्त होते.

स्त्रीमन कोमल असते तसेच ते कठोरही असते. जनीच्या कवितेत त्याचाही धावा करताना जनीचे शब्द कठोर प्रसंगी विठ्ठलाचा धावा करताना कठोर बनतात. परमार्थात आपले आयुष्य व्यतीत करणाऱ्या जनीवर त्याकाळात अनेक आक्षेप आले असावेत. समाजाच्या टीकेला व अपमानाला तोड द्यावे लागले असेल. अशावेळी जनीने कशाचीही पर्वा केली नाही. आपली विठ्ठल भक्ती आक्रमक व रांगडया भाषेत तिने कथन केली

''डोईचा पदर आला खांद्यावरी
भरल्या बाजारी जाईन मी
हाती घेईन टाळ खांद्यावरी विना
आता मज मना कोण करी

पंढरीच्या पेठे मांडियले पाल
मनगटावर तेल घाला तुम्ही
जनी म्हणे देवा मी झाले वेसवा
रिघाले केशवा घर तुझे''

जनीचा हा एक उल्लेखनीय अभंग आहे. येथे जनी डोक्यावरचा पदर खाली टाकून भरल्या बाजारात निर्भयपणे जात असते अर्थात हा बाजार म्हणजे पंढरीची भक्तीपेठ आहे. ज्यांना त्याबद्दल जे कांही म्हणावयाचे असेल ते त्यांनी खुशाल म्हणावे जनी त्यांना भीक घालणार नाही भक्तीसाठी तिने सर्व लाज, लज्जा सोडली आहे. जनीच्या वरील उद्‌गाराचे साम्य तुकोबांच्या उक्तीसी देखील सहजपणे जुळू शकते तुकोबाने देखील निर्भयपणे जननिंदेची परवा न करता भक्तीचा पुरस्कार केला.

जनीच्या अभंगाचे निराळे वैशिष्टय यादव कालीन साहित्यात उठून दिसते. ग्राम्यता, असभ्यता याचाही वापर करून जनीने देवाचे धिंडवडे काढले. तसे तर संत नामदेवही देवावर रागावत असत; पण त्यांचा राग आणि हट्ट आईच्या कुशीत विसावलेल्या लहान बाळाप्रमाणे होता; पण जनीचा राग तिच्या रांगडया वृत्तीप्रमाणे सडेतोड आणि उघड होता. विठ्ठलास जनीने रागावून-

''अरे विठया विठया
मूळ मायेच्या कारटया''
''तूझी रांड रंडकी झाली
तुझे मडे गेले''

अशा शब्दात जनी अंगणात उभी राहून देवाला शिव्या देत असते अर्थात या शिव्यातही वेदांत भरला आहे ही गोष्ट वेगळी परंतु ग्राम्यभाषेचा धीटपणे वापर करून आपल्या भावना व्यक्त करण्याची प्रवृत्ती जनीच्या काव्यात प्रथमच आढळते. बोलून चालूनच जनी ही एक अशिक्षित ग्रामीण स्त्रीच होती. तिच्या तोंडी शोभून दिसणारे उद्‌गार आणि भावना व्यक्त झाल्या नाहीत तरच नवल. एका पदात खंडोबास नवस केला आहे. त्या नवसात सासू, सासरा, नणंद हे सर्व मरून जावेत. म्हणजे खरा आनंद होय. सर्वच मेले म्हणजे मला एकटीला तुझ्या पायाजवळ राहता येईल. अशा तऱ्हेची भूमिका जनीने एका भारूडात घेतली आहे; पुढे संत एकनाथांनी अशाच प्रकारचे एक भारूड लिहिले. त्यात एक प्रापंचिक स्त्री देवीला नवस बोलत असते. त्यातही सासू, सासरा, नणंद, जाऊ यांचा काटा काढावा आणि मला एकटीलाच भक्ती करण्यासाठी मोकळीक राहू दे. असा नवस केला आहे. जनीच्या खंडोबाच्या भारूडात जे प्रापंचीक स्त्रिचे दुःख आहे ते फटकळ भाषेत व्यक्त झाले आहे. जनीला सासू, सासरा अशी कोणतीच नाती नव्हती; पण परमार्थात विघ्न निर्माण करणारे अहंकार, काम, क्रोध, आशा, ममता यावर केलेले हे एक रूपक आहे. या रूपकात विनोदाची ही छटा आढळते अर्थात एकनाथांच्या सारखा खुसखुशीत विनोद जनीच्या भारूडात आढळत नाही.

थोडक्यात जनीचे अभंग ज्ञानदेव, नामदेवकालीन संत मंडळातील अभंग रचनेत मिसळून गेल्यासारखे वाटत असले तरी बारकाईने पाहिल्यास जनीच्या कवितेचे एक निराळे वैशिष्टय आढळते. जनीच्या कवितेत एकच सुर ऐकू येतो तो म्हणजे ''विठ्ठलभक्ती एकच रंग जनीच्या अभंगाला प्राप्त झाला आहे. तो म्हणजे विठ्ठलभक्तीचा रंग होय. विठ्ठलासी निरंतर सन्मुख राहूनच निरीक्षण जसे चौफेर होते किंवा मनुष्य स्वभाव, प्राणी मात्रांच्या हालचाली, निसर्गाचे बदल इत्यादी विषयी तुकोबांचे मन जागरूक होते. त्यामुळे त्यांच्या कवितेतील प्रतिमा सृष्टीत ही विविधता आली आहे.

संत एकनाथ यांच्या सामाजिक व राजकीय जाणीवेचा आवाका खुपच मोठा होता. संसारातील नानाविध सुख दुःखाच्या अनुभवाचा खजिना नाथांच्याकडे होता. त्यामुळे त्यांची भारूडे विलक्षण नाटयात्मक व

खुसखुशीत विनोदी ठरली आहेत. त्या तुलनेत जनीचा अनुभव अतिशय मर्यादित ठरतो. तिच्या कवितेतील प्रतिमा सृष्टीकडे पाहिल्यास आपणास त्याची प्रचिती येते ठराविक क्षेत्रातील प्रतिमाने जनीच्या कवितेत आढळतात. देवास आळवताना जनी म्हणते -

''गंगा गेली सिंधूपासी
तेने अव्हेरिले तिशी
तरी सांगावे कवणाला
ऐसे बोले बा विठ्ठला
जळ कोपे जळचरा
माता अव्हेरी लेकुरा''

अशा शब्दात जनीने आपला अतुट प्रेमभाव व्यक्त केला आहे. किंवा

''माझी आंधळयाची काठी
अडकली कवणे बेटी''

अशा शब्दात जनीने देवाचा धावा केला आहे. आंधळयाच्या काठीची प्रतिमा खरोखरच वेधक आहे. विठ्ठल हा जनीच्या भावजीवनाचा एकमेव आधार आहे. देव आणि भक्त यांच्यातील नाते माता आणि आपल्या प्रमाणे आहे, पक्षी आणि तिचे बाळ, घार आणि तिची पिले, आई आणि तिचे बाळ, वानर आणि वानराचे पिल्लू यांच्या प्रतिमांचा वापर करून जनीने परमेश्वर भक्तावर सदैव मायेची पाखर घालतो आहे असे सूचविले आहे.

जनीच्य भावजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या या प्रतिमा खरोखरच उत्कट आहेत. संताच्या संगतीचा परिणाम चंदनाच्या संगतीत हिनकस लाकडात चंदनाचा सुगंध निर्माण होतो, परीसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते, किंवा लग्नात नवरा नवरीच्या निमित्ताने वऱ्हाडी मंडळीस ही पक्वान्ने खावयास मिळतात. या प्रतिमांनी संताच्या संगतीने ठरविणारे परिवर्तन मार्मिकपणे सूचीत केले आहे. रूपकात्मक प्रतिमाने जनीच्या अभंगात कांही ठिकाणी मात्र रूपकात्मक प्रतिमाने आढळतात.

''देव खाते
देव पिते
देवावरी मी निजते
देव देते, देव घेते
देवासवे व्यवहारिते
देव येथे देव तेथे
देवाविना नाही रिते
जनी म्हणे विठाबाई
भरूनि उरले अंतरबाही''

वरील अभंगातील अनुभव रूपकात्मक शैलीतून व्यक्त झाला आहे. ही अनुभूती खाणे, पिणे, निजणे, देणे, घेणे इत्यादी क्रियाजन्य अनुभूतीतून सहजपणे व्यक्त होते. येथे अनुभवच विविध प्रकारच्या क्रियाजन्य प्रतिमानातून निर्माण होते.

''आनंदाचा डोह
स्वरूपाची खाणी
विवेकाची पेठ
शब्दसुमनांची सेज''

यासारख्या रूपकात्मक शब्दात ज्ञानदेवांच्या कोमल प्रतिभेचा ठसा उमटलेला आहे. स्थूल रूपके जनीचे कांही अभंगात स्थूल रूपके आहेत. खंडोबास उद्देशून लिहिलेले नवसाचे गाणे, किंवा जनीने लिहिलेला गोरक्षाचा पाळणा ही स्थुल रूपके आहेत. यादव काळातील लोकजीवनात प्रचलित असलेल्या गाण्यांचा येथे रूपकासारखा वापर केला आहे. असे असले तरी जनीच्या अभंगात कांही प्रसंगाची सुंदर चित्रे रेखाटली आहेत. त्यात तिचे आत्मकथन आढळते.

एका दिवसी देव अचानकच नामदेवाच्या वाडयात आले. नामदेवासह सर्वांनी देवाची भेट घेतली; पण जनी मात्र कुठे दिसत नव्हती. देवाने अस्वस्थ होऊन तिची चौकशी केली कुणी तरी म्हटले. जनी बाहेर गेली आहे. तेवढयात जनी हात धुवून आलीच; पण तेवढया वेळातच देव अतिशय अस्वस्थ झाले त्यास थोडासा राग आला. आपण आलो आणि जनी नाही हे देवाला आवडले नाही आणि याचे जनीला हसू आले अशा प्रकारचा एक कोमल आणि भावोत्कट क्षण जनीच्या कवितेत आढळतो.

एका अभंगात ज्ञानेश्वरासह सर्व संत जनीच्या झोपडीत आले एवढा मोठा देव; पण जनीच्या प्रेमाला भुलला जात्यात वरणं टाकून तो गाणे गात दळू लागतो; पण अचानकच ज्ञानेश्वर महाराज इत्यादी संतांना झोपडीच्या दारात पाहुन देव देखील कावरा बावरा झाला आणि गुपचूप राऊळाकडे निघाला विठ्ठलाचे हे मानवी रूप भक्ताविषयीच्या अनेक प्रेमळ भावनांनी भारावून गेलेले दिसते किंवा आणखी एका अभंगात देवाने.

एका रात्री जनीच्या झोपडीत मुक्काम केला आणि आपल्या गळयातील रत्नजडीत हार किंवा पदक टाकून देऊन जनीची वाकळ पांघरून देव तातडीने राऊळाकडे निघाला; पण महाद्वारात सर्व भक्तगण गोळा होताच चोरी झाल्याचे लक्षात आले आणि ही चोरी जनीनेच केली आहे हे सिध्द झाले आहे. देवाचे हे नाटक जनीच्या अभंगात साध्या शैलीतून व्यक्त झाले आहेत.

एका अभंगात संत नामदेव आणि ज्ञानदेव तिर्थयात्रेस निघाले आहेत. त्यावेळी देवाचा कंठ दाटून आला. नामदेवास सांभाळून न्याचे ते अजाण आहेत त्यास चालण्याची सवय नाही. तहान, भूक त्यास कळत नाही, त्याच्या पायात काटे मोडतील तेंव्हा तुम्ही सर्व सुज्ञानी त्यास सांभाळून न्यावेत असे म्हणताच देवाचा कंठ दाटून आला, डोळयातून अश्रू ओघळू लागले जनीच्या अभंगातील विठ्ठलाची अशी प्रेमळ व वत्सल रूपे वरील दृश्यातून साकार झाली आहेत.

सर्व संताच्या अभंगवाणीत उपदेशाचे कांही ठराविक विषय असतात. त्याप्रमाणे जनीच्या ही अभंगात नामाचे महत्व, हरी कथेच महत्व पंढरीच्या वारीचे महत्व वर्णन केलेले आढळते. विशेषतः विठ्ठलाचे नाम हे सर्व साधनांचे सार आहे. किंबहुना नाम घेताना कोणत्याही प्रकारची आडकाठी नाही नामाने पुराणकाळात अजामेळाचा उध्दार झाला त्याचप्रमाणे जनीच्या काळात चोखामेळा इत्यादी संतांचा ही नामाने पुराण काळात अजामेळाचा उध्दार झाला त्याचप्रमाणे जनीच्या काळात चोखामेळा इत्यादी संतांचाही नामाने उध्दार झाला. हा विषय जनीने अनेक ठिकाणी वर्णन केला आहे. पंढरीची वारी हा एक जिव्हाळयाचा विषय जनीने आपल्या अभंगातून वारंवार गायला आहे. हरी कीर्तन हे देखील परमेश्वर प्राप्तीची एक सुलभ साधन आहे. अशा प्रकारचा बोध जनीने केलेला आढळतो विषयसुखाचा परिणाम शेवटी वाईट असतो. हे जनीने एका अभंगात हरीण, हत्ती, पतंग, मासा आणि भ्रमर यांच्या दृष्टांतातून स्पष्ट केले आहे. हे सर्वजण कोणत्या तरी लोभाला बळी पडून स्वतःचा नाश ओढवून घेतात. अशा प्रकारचे पारंपारिक प्रतिमाने योजून शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पंचविषयाच्या नादी लागून माणसाने आपला नाश ओढवून घेऊ नये. असे जनीचे सांगणे आहे. चोराच्या संगतीत केलेला प्रवास माणसाला नागवून टाकतो किंवा विस्तवाबरोबर खेळणाऱ्या माणसाचे हात

पोळल्यावाचून राहत नाहीत अशा कांही दृष्टांताच्याद्वारे जनीने विषय सुखाचा परिणाम शेवटी नाशकाली असतो हे स्पष्ट आहे.

निष्कर्ष :-

अशा प्रकारे जनीचे साक्षात्काराचे कांही अभंग अतिशय गुढ आहेत योगाच्या परीभाषेत हे अनुभव व्यक्त झाले आहेत शून्य योगमार्गातील एक अंतीम अनुभूती आहे. त्या शून्याच्या माध्यमातून जनीने ही आपला अनुभव कथन केला आहे. ज्ञानदेवादी संतांच्या संगतीचा परिणाम अशा अभंगातून पाहवयास मिळतो. थोडक्यात मराठी संत साहित्यात जनीचा अभंग रसमिसळ झाल्यासारखा वाटत असला तरी सुक्ष्मपणे पाहिल्यास जनीच्या अभंगातील पृथगात्मकता (वेगळेपणा, निराळेपणा) जाणवल्याशिवाय राहत नाही. तिच्या स्त्री सुलभ मनाचे वैशिष्टये, श्रम आणि प्रश्न यांच्यासी समरस होऊन गायलेली जनीची कविता निश्चितच संत साहित्यात आपले वेगळे वैशिष्टये राखून आहे.

संदर्भ ग्रंथ :-

1) अ.ना.देशपांडे, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास.
2) ल.रा.नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास', फडके प्रकाशन.
3) प्र.न.जोशी, 'मराठी वाङमयाचा इतिहास (प्राचीन काळः प्रारंभापासून पेशवाई अखेरपर्यंत)', प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, 1978
4) मोहन शेळके, 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास', कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद.
5) यशवंत साधु, 'गवाक्ष', रजत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1998
6) यशवंत साधु, 'मंथन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2002
7) इंद्रजीत भालेराव, 'लोककहाणी जनाबाईची', साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2012.
8) आरती दातार, 'महाराष्ट्रातील संत कवयित्री', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, 2015
9) विद्यासागर पाटंगणकर, 'मराठी संतकवयित्रींचा इतिहास', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, 2015
10) विद्यसागर पाटंगणकर, 'निवडक अभंग ज्ञानेश्वर ते तुकाराम', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2000
11) दादा गोरे, 'अभंगवाणी', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1998.
12) हे.वि.इनामदार, 'भक्तिमंदिरातील नंदादीप', इंद्रायणी साहित्य, पुणे, प्रथमावृत्ती, 2000.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com